# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 22/01/2020 (बुधवार)
# (सकाळ)

---

## चोरी

1) पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मौजा अडेगाव येथे दिनांक 21/01/2020 चे 12:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. दुर्गा अरूण तितरमारे, वय 34 वर्ष, रा. अडेगाव, ता. कुही या त्यांच्या घरी घरा शेजारी शेतीत कचरा काढत असतांना तीन अनोळखी आरोपीतांनी फिर्यादीच्या घरासमोर येवून भांडे धुण्याचा लिक्विड घेता का, असे विचारले. तेव्हा फिर्यादीने त्यांना बोलावले आरोपीतांनी फिर्यादीला सांगितले की, या लिक्विडने सोने–चांदीचे दागिने पायपट्ट्या साफ होतात असे म्हटल्याने फिर्यादीने त्यांना आपले जवळील डोळमनी अडीच ग्रॅम, कानातील टाप्स अडीच ग्रॅम व सासुचे कानातील अडीच ग्रॅम टाप्स काढून दिले. तेव्हा आरोपीतांनी फिर्यादीला स्टीलचा झाकन असलेला डबा मागितला असता फिर्यादीने डबा आणण्याकरीता घरात जावून बाहेर आल्या. दरम्यान अनोळखी तीन आरोपीतांनी फिर्यादीने काढून दिलेले दागिने घेवून मोटरसायकलने पळून जातांना दिसले. एकुण चोरीस गेलेले दागिने जुने वापरते कि. 1,300/– रू. तोळा प्रमाणे एकुण साडे सात ग्रॅम वजनाचे 9,750/–रू. किंमतीचे सोन्याचे दागिने घेवून चोरून पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलुतर येथे आरोपीतांविरुध्द कलम 380, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार यादवराव कुमरे हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 07 कि.मी अंतरावर संत गजानन हॉल पिपळा डाग बंगला येथे दिनांक 20/01/2020 चे 21:20 वा. दरम्यान फिर्यादी नामे– उत्तमकुमार रामशिलाल कोदली, वय 31 वर्ष, रा. मिनल रेसिडेंसी जे के रोड भोपाल हे त्यांच्या साळयाचे लग्नाकरीता संत गजानन हॉल व लॉन येथे गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी जवळचे दोन पर्स ज्यात नगदी 5,000/–रू., तसेच फिर्यादींचया पत्नीच्या हॅन्ड बॅगमध्ये असलेले 1 तोळा सोन्याची चैन कि 20,000/–रू., एक तोडा सोन्याचे कानातील लटकन कि 20,000/–रू., एक 1 .प्लस 7 टी कंपणीचा मोबाईल कि 20,000/–रू., एक ओपो कंपनीचा मोबाईल कि. 10,000/–रू., असा एकुण 75,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार राजेश पिसे 9881377348 हे करीत आहे.

3) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत नैद्यदम हॉल, नांदा येथे दिनांक 20/01/2020 चे 22:20 वा. ते 22:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलीप रामाजी बासोटीया, वय 60 वर्ष, रा. शितला माता चौक सावनेर हे त्यांची पुतनीच्या लग्नला नैवद्यम हॉल नांदा येथे आले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने लग्न कार्यक्रमात वधुला हातात आलेले एकुन भेट वस्तु अंदाजे मध्ये 1,00,000/–रू. चे लिफाफे व 40,000/–रू. चे सोने–चांदीचे दागिने असा एकुण कि. 1,40,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रितम निमसडे 8999917112 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर